दैनिक
# विवेक सिंधु

बीड जिल्हा | रविवार, दि.15 जून 2025 | viveksindhu@gmail.com | वर्ष 45 वे | अंक क्र.67 | पाने 4 | किंमत : 2 रु. | www.Vivek Sindhu.com

## राज्यात मान्सूनची वेगाने आगेकूच

### मराठवाडा, विदर्भात दोन दिवसांचा यलो अलर्ट



छत्रपती संभाजीनगर – मान्सूनचा वेग पुन्हा वाढल्यामुळे 25 जूनपर्यंत दिल्लीसह वायव्य भारतातील बहुतांश भागांमध्ये पोहोचण्याची शक्यता आहे. हवामान विभागानुसार 18 जूनपर्यंत मान्सून मध्य आणि पूर्व भारतातील उर्वरित भागांमध्ये तसेच वायव्य भारतातील काही भागांमध्ये पोहोचेल. त्यानंतर 19 ते 25 जून दरम्यान हा वायव्य भारतातील बहुतांश भाग व्यापेल. रखडलेला मान्सून महाराष्ट्रातही सक्रिय झाला आहे. पुढील ४८ तासांत मान्सून संपूर्ण विदर्भ व्यापणार असल्याची

▸ पान 3 वर

## बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन स्थगित

### मागण्या मान्य न झाल्यास 2 ऑक्टोबरला मंत्रालयात शिरण्याचा इशारा

अमरावती – शेतकरी कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी गत 7 दिवसांपासून अन्नत्याग उपोषण करणाऱ्या बच्चू कडू यांनी शनिवारी आपले उपोषण स्थगित करण्याची घोषणा केली. या प्रकरणी त्यांनी सरकारला आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी 2 ऑक्टोबरपर्यंतची मुदत दिली आहे. सरकारने आमच्या मागण्या मान्य केल्या नाही तर 2 ऑक्टोबर रोजी आम्ही थेट मंत्रालयात शिरू, असे ते या प्रकरणी सरकारला इशारा देताना म्हणालेत.

प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू गत 7 दिवसांपासून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी अन्नत्याग उपोषण करत होते. या उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावली होती. डॉक्टरांनी त्यांना रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला होता. पण त्यानंतरही बच्चू कडू यांनी आपले उपोषण नेटाने पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला होता. त्यांनी परवापासून थेट अन्नत्याग करण्याचाही इशारा दिला होता. त्यामुळे मंत्री उदय सामंत यांनी शनिवारी तातडीने त्यांची भेट घेऊन त्यांना सरकार आपल्या मागण्यांवर सकारात्मक असल्याचे सांगत त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली. त्यानंतर बच्चू कडू यांनी उदय सामंत यांच्या विनंतीचा मान राखत आपले अन्नत्याग उपोषण मागे घेण्याची घोषणा केली. उद्याचे चक्का जाम आंदोलन स्थगित करण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.



बच्चू कडू उपस्थितांशी संवाद साधताना म्हणाले, सरकारने आपल्या मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे आपण हे आंदोलन मागे घेत नाही, तर स्थगित करत आहोत. सरकारने आपल्या मागण्यांवर ठोस निर्णय घेतला नाही, तर 2 ऑक्टोबर रोजी आपण थेट मंत्रालयात शिरू. आपण सरकारला छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखा चकवा देऊ. सांगू नागपूरला

▸ पान 2 वर

## वीज पडून कुंबेफळला गाय ठार



केज – केज तालुक्यात शुक्रवारी सायंकाळी ५.३० ते ६ वाजेच्या दरम्यान झालेल्या पावसात कुंबेफळ येथे वीज अंगावर पडल्याने गाय ठार झाली. तर पवारवाडीत ही घरावर वीज पडल्याने घराचे थोडे नुकसान झाले.

कुंबेफळ येथील शेतकरी शिवाजी गणपती थोरात हे शेतात गायी चारीत असताना शुक्रवारी सायंकाळी ५.३० ते ६ वाजेच्या दरम्यान आल्याने गायी कोठ्याकडे जात असताना एका गायीच्या अंगावर वीज कोसळल्याने गायीचा जागीच मृत्यू झाला. तर शेतकरी शिवाजी थोरात हे सुदैवाने बचावले. तर तालुक्यातील पवारवाडी येथील भागवत पवार यांच्या घरावर ही वीज पडली आहे. त्यात भिंतीचे नुकसान झाले असून सुदैवाने घरात असलेल्या कुटुंबातील कोणालाही इजा झाली नाही.

## केज येथे सोन्याच्या दुकानातून चार महिलांनी चांदीचे दागिने केले लंपास

केज – चांदीचे चैन खरेदी करण्याच्या बहाण्याने गिऱ्हाईक बनून आलेल्या चार अनोळखी महिलांनी सोन्याच्या दुकानातून ५८ हजार रुपये किंमतीचे ७ चैन जोड चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली.

केज शहरातील कानडी रस्त्यावर कुंदन बालासाहेब जोगदंड यांचे श्री ज्वेलर्स नावाचे सोन्याचे दुकान असून या दुकानात ११ जून रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास चार अनोळखी महिला गिर्हाईक बनून आल्या. त्यांनी पायातील चांदीचे चैन खरेदी करण्याच्या बहाणा करीत कुंदन जोगदंड यांची नजर चुकवून दुकानातून चांदीचे ७ चैन जोड घेऊन निघून गेल्या. त्यानंतर चैन चोरीचा प्रकार त्यांच्या लक्षात आला. कुंदन जोगदंड यांनी दिलेल्या तक्रारीवरून चार अनोळखी महिलाविरुद्ध केज ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तपास जमादार बाळासाहेब अहंकारे हे करीत आहेत.

## शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजनांची गरज : जिल्हाधिकारी



माजलगाव – बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर शेतक–यांच्या आत्महत्या होतात. यावर प्रशासकीय पातळीवर व पालकमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपाययोजना करण्याचे काम सुरू आहे. शेतक– यांसह सर्वसामान्यांनी येत असलेल्या अडी – अडचणी सोडविण्यासाठी प्रशासनाकडे अर्ज करावेत. आत्महत्या हा पर्याय नसुन शेतक–यांनी आत्महत्या करू नये असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले. शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरात दि. 13 शुक्रवारी ते बोलत होते.

उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसिलदार संतोष रूईकर, गटविकास अधिकारी जोत्सना मुळीक यांचेसह प्रशासनातील तलाठी, ग्रामसेवक अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. पुढे बोलतांना श्री. जॉन्सन म्हणाले की, प्रशासन लोकाभिमुख शिबीर घेत असेल अशा शिबीरात सर्वांनी सहभागी झाले पाहिजे. जेणेकरून प्रशासनातील विवीध कल्याणकारी योजनांची माहिती मिळुन विवीध योजनांचा लाभ मिळणे शक्य होते. जनता केंद्रबिंदु मानुन जनतेच्या सेवेसाठी अधिकारी म्हणून इकडेबसलो आहोत. त्यामुळे कुठलाही त्रास असेल, कुठले काम होत नसेल, अधिकारी काम करत नसतील अशा वेळेला थेट जिल्हाधिकारी कार्यालयात तक्रार करा असे तसेच कुठल्याही परिस्थितीत बालविवाह रोखा व मुलीचे आयुष्य वाचवा. बालविवाहाला

▸ पान 2 वर

## विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांचा प्रश्न मार्गी लावणार

### धनंजय मुंडे यांचे विनाअनुदानित शाळा कृती समितीला आश्वासन

बीड– महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीची रास्त मागणी सभागृहात मांडून येत्या पावसाळी अधिवेशनात टप्पा वाढीसाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून निधीची तरतूद होई पर्यंत पाठपुरावा करून आपला प्रश्न मार्गी लावतो असे आश्वासन माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि जेष्ठ समाज–सेवक डॉ. संजय तांदळे यांना दिले.



माजीमंत्री धनंजय मुंडे हे काल दि. १३ जून रोजी बीड शहरात आले असता बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांनी त्यांची भेट घेऊन विना अनुदानित शाळेतील शिक्षकांच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले. या मध्ये प्रामुख्याने राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेध्याशानुसार वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आवश्यक निधीची तरतूद करावी अशी मागणी करण्यात आली.

यावेळी

▸ पान 3 वर

## बीड शहर ठाण्याचे पोलीस निरीक्षक बल्लाळ यांच्या पाठीवर कौतुकाची थाप

### उल्लेखनीय कामगिरी बद्दल पोलीस अधीक्षक यांचे प्रमाणपत्र


बीड – शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी कौतुकाची थाप मारुन त्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव केला आहे. बीड शहर पोलीस ठाणे हद्दीत अनेक कारवाया करुन चांगल्या प्रकारे अवैध धंद्यांना आळा बसलेला असून, तसेच गुन्हेगारां मध्ये कारवायांच्या माध्यमातून खाकीचा धाक निर्माण केला आहे.



नुकताच भरदिवसा घरफोडीची घटना घडल होती. त्या घटनेचा अवघ्या ४८ तासांत तपास लावून चोरी गेलेला साडेदहा लाखांचा मुद्देमाल जप्त करुन आरोपी महिला

पान ३ वर

## • चाकरवाडीत सांगता सोहळ्यात भक्तांची महागर्दी



श्रीक्षेत्र चाकरवाडी – 21 व्या शतकातले संत शिरोमणी वै. ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या रौप्यमहोत्सवी पुण्यतिथीनिमित्त चाकरवाडी या श्रीक्षेत्री गेल्या सात दिवसांपासून अखंड हरिनाम सप्ताह आणि महाशिवपुराण कथा सुरू आहे. आज या सप्ताहाची समाप्ती असून सकाळी काल्याचे किर्तन ह.भ.प. संदीपान महाराज हसेगावकर यांच्या वाणीतून झाले. ते म्हणाले, माऊली महाराज वारकरी संप्रदायाचे उच्चकोटीचे महात्मे. माऊली महाराजांच्या श्रीहरी भक्तीचे तुम्ही–आम्ही पाईक आहोत. काल्याच्या कीर्तनाला लाखोंच्या उपस्थितीत श्रीक्षेत्र चाकरवाडी – 21 व्या शतकातले संत शिरोमणी वै. ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या रौप्यमहोत्सवी पुण्यतिथीनिमित्त

▸ पान 3 वर

## पेठ बीड पोलिसांची गुटख्यावर कारवाई



बीड – पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भुई गल्ली येथे एका घरात गुटखा असल्याची माहिती पोलिसांना मिळताच सदरील ठिकाणी कारवाई करत गुटखा व मोटार सायकल असा एकूण १ लाख ३९ हजार १७ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

बीड शहरातील भुई गल्ली येथील मयत वाजेद हसन बागवान यांचे घर भाड्याने घेवून त्यामध्ये गुटखा ठेवण्यात आला होता.

याची माहिती पेठ बीड पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळी जावून कारवाई करत १ लाख ९ हजार १७ रूपयांचा गुटखा व मोटार सायकल असा एकूण १ लाख ३९ हजार १७ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आरोपी शेख खदीर शेख बशीर, शेख अर्सला शेख खदीर या दोघांजणाविरोधात पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, विभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक अशोक मोदीराज, पो.हे.कॉ. रमेश, अल्ताफ, अनिल यांनी केली आहे.

## पाचवीच्या वर्गातील मुलीचा तासाभरात दोनदा विवाह

### नातेवाईक व मुलीचे आई-वडील यांच्याविरोधात गुन्हा दाखल

बीड : शाळेत जाण्याची तयारी करणाऱ्या पाचवीच्या वर्गातील मुलीचा तासाभरातच दोन वेळा विवाह लावल्याचा धक्कादायक प्रकार गुरुवारी सकाळी उघडकीस आला. तक्रारीची कुणकुण लागताच पहिला नवरदेव पळून गेला, तर दुसऱ्याला नवरीला घेऊन जात असताना शिवाजीनगर पोलिस ठाण्यासमोर पकडण्यात आले. रात्री ९ वाजता दोन नवरदेवांसह त्यांचे नातेवाईक व मुलीचे आई–वडील यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.



सोनिया (नाव बदलले, रा. बीड) ही अवघ्या १३ वर्षांची आहे. नुकतीच ती पाचवी पास झाली असून, सोमवारपासून सहावीच्या वर्गात जाण्यासाठी तयार होती. तिला वडील आणि सावत्र आई आहे. परंतु, त्यांनी सोनियाचे लग्न आधीच दोन विवाहासह दोन मुलांचा बाप असलेल्या सुलेमान पठाण (२५, रा. बेलखंडी पाटोदा, ता. बीड) याच्यासोबत जुळवले. गुरुवारी सकाळी ८ वाजताच शाहूनगर भागातील घरात विवाह लावला. त्याचे फोटोही काढले; परंतु सुलेमानच्या पत्नीने तक्रार केली. याची कुणकुण सुलेमानला लागली. त्यामुळे त्याने आपल्या बहिणीच्या गावच्या आसेफ शेख (रा. खांडवी, ता. गेवराई) याला तेथे पाठवले आणि स्वतः पळून गेला. त्यानंतर मुलीचा विवाह आसेफबरोबर झाला. त्या विवाहाचे फोटोही काढले. या प्रकरणात कोणाला संशय येऊ नये, म्हणून आसेफ

▸ पान 3 वर

# स्व. संतोष देशमुखांच्या जयंती निमित्त ४० जणांचे रक्तदान; त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन

केज – मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात चाळीसहून अधिक जणांनी रक्तदान केले. मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. हे प्रकरण बीडच्या विशेष न्यायालयात न्यायप्रविष्ट असून या प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे हा अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नाही. १२ जून रोजी स्व. संतोष देशमुख यांच्या जयंतीनिमित्त गावात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

या शिबिरात देशमुख यांची कन्या वैभवी देशमुख, भाऊ धनंजय देशमुख यांच्यासह चाळीसहून अधिक जणांनी रक्तदान केले. यावेळी रक्तपेढीचे आरोग्य कर्मचाऱ्यांनी रक्त संकलन केले. तर रक्तदात्यांनी केलेल्या रक्तदानामुळे गरजू रुग्णांना रक्त मिळण्यास मदत होणार आहे. शिबिरास गावातील तरुण, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



स्व. संतोष देशमुख हे मस्साजोग येथील सरपंच होते. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात गावच्या सर्वांगीन विकासाचे काम केलें आहे.

सर्वसामान्य नागरीकांच्याहक्काचा माणुस अशी ओळख सरपंच देशमुख यांची होती. परंतु नियतीने त्यांच्यावर घाला घातला. त्यांची निघृणहत्या करण्यात आली. त्यामुळे संपूर्ण मस्साजोग गाव एका चांगल्या नेतृत्वास मुकला. अशी भावना अभिवादनासाठी आलेल्या नागरीकांकडून व्यक्त करण्यात येत होती. या जयंती कार्यक्रमासाठी मस्साजोग व परिसरातील गावचे नागरीक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

## मित्रासोबत चाकरवाडीला जातो, असे सांगून गेलेला ३२ वर्षीय इसम बेपत्ता



केज – कृषी केंद्रावर काम करीत असलेला ३२ वर्षीय इसम हा त्याच्या मित्राच्या सोबत चाकरवाडी जात असल्याचे सांगून गेला. मात्र तो घरी परत न आल्याने तो बेपत्ता असल्याची तक्रार त्याच्या पत्नीने पोलिसात दिल्यावरून मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.

नांदुरघाट (ता. केज) येथील विलास मदन पाटोळे (वय ३२) हे नांदूर फाटा येथील शिवप्रसाद कृषी सेवा केंद्रावर काम करतात. १२ जून रोजी विलास पाटोळे हे कृषि सेवा केंद्रावर काम करून सायंकाळी घरी आले. जेवण करून त्यांनी पत्नीकडे फायनान्सच्या कर्जाचा हप्ता भरण्यासाठी पैसे दिले. त्यानंतर मित्रासोबत चाकरवाडी येथे सुरु असलेल्या शिवपुराण कथेच्या कार्यक्रमाला जात आहे, असे सांगून निघून गेले. त्यानंतर रात्री ते घरी परत आले नाहीत. त्यांचा मोबाईल ही बंद आढळून आल्याने त्यांची पत्नी ज्याती विलास पाटोळे यांनी पती विलास पाटोळे हे बेपत्ता असल्याची तक्रार केज पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यावरून मिसिंगची नोंद घेण्यात आली असून पोलीस तपास करीत आहेत.

## आंदोलन स्थगित...पान १ वरून

शेतकरी कर्जमाफीसाठी १५ दिवसांत उच्चस्तरीय समिती नेमली जाईल. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कर्जमाफी संदर्भात निर्णय घेण्यात येईल तसेच थकीत कर्जदाराच्या सक्तीच्या वसुलीला स्थगिती देणे व नवीन कर्ज वाटप करण्यासाठी बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल. दिव्यांगाच्या मानधन वाढी बाबत ३० जूनच्या पुरवणी बजेटमध्ये तरतूद करण्यात येईल. उर्वरित मुद्यांवर संबंधित मंत्री तथा मुख्यमंत्री महोदय यांच्यासोबत बैठक घेऊन मागण्या निकाली काढल्या जातील.

तत्पूर्वी, बच्चू कडू यांनी सरकारला सोमवारपासून पाणी सोडण्याचा इशारा दिला होता. खरे तर शेतकरी कर्जमाफीचा निर्णय यापूर्वीच व्हायला हवा होता. पण सरकारने आता यासंबंधी एक उच्चस्तरीय समिती नेमण्याचा निर्णय घेतला आहे. या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कर्जमाफीचा निर्णय घेतला जाणार आहे. पण या समितीची अहवाल केव्हा येणार? कोणत्या तारखेला कर्जमाफीची घोषणा करणार? हे काहीही स्पष्ट नाही. या मुद्यावर मी कार्यकर्त्यांशी चर्चा करणार आहे. या बैठकीत एखादा निर्णय होईपर्यंत कार्यकर्त्यांनी संयम राखावा. कोणतेही अनुचित कृत्य करू नये. पण माझी मानसिकता आहे की, १६ तारखेपासून पाणीही सोडून द्यावे, असे बच्चू कडू म्हणालेत.

दुसरीकडे बच्चू कडू यांच्या पत्नी नयना कडू यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपोषणामुळे काय स्थिती होते हे पाहण्यासाठी एक दिवसाचा उपवास करण्याचे आव्हान दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक दिवस उपवास करावा. त्यानंतर आमच्या अमृता वहिनींची काय स्थिती होते हे पाहावे. यापुढे बच्चू कडू यांना अन्नत्याग करण्यास फशी पाडले, तर खबरदार. प्रहारचा कार्यकर्ता संपूर्ण मंत्रिमंडळाला अन्नत्याग आंदोलन करण्यास भाग पाडेल हा माझा शब्द आहे, असे त्या म्हणाल्या.

बच्चू कडू पाचव्यांदा अन्नत्याग आंदोलन करत आहेत. त्यांना सुळावर देण्यासाठी त्यांच्या आईने त्यांना जन्माला घातले आहे का? कोणत्याही शासनाने गेंड्याची कातडी बाजूला ठेवून मातीतल्या माणसांचे कल्याण करावे. भाजप असेल किंवा काँग्रेसचे सरकार असेल सर्वांनी शेतकरी व दिव्यांग यांच्यासाठी जातपात व स्वतःचा स्वार्थ दूर ठेवावा, असेही त्या यावेळी बोलताना म्हणाल्या होत्या.

तत्पूर्वी, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी बच्चू कडू यांची भेट घेऊन त्यांना आपले उपोषण मागे घेण्याचे आवाहन केले होते. पण कडू यांनी त्यांचे आवाहन धुडकावून लावत आपण आपल्या उपोषणावर ठाम असल्याचे स्पष्ट केले. कडू मागील ७ दिवसांपासून गुरूकुंज मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन करत आहेत. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, दिव्यांगांना ६ हजार रुपये मानधन आदी १७ मागण्या त्यांनी केल्या आहेत.

# शेतकऱ्यांनी ठिबक तुषार घटकासाठी अर्ज करावेत

बीड – राष्ट्रीय कृषी विकास योजना – प्रति थेंब अधिक पिक योजना अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर अनु.जाती व अनु.जमाती प्रवर्गातील शेतकरी बांधवांनी ठिबक, तुषार घटकासाठी अर्ज करावेत.

असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड एस.एम.साळवे यांनी केले आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजना – प्रति थेंब अधिक पिक योजनेतर्गत ठिबक/ तुषार घटकासाठी महाडीबीटीपोर्टलवर अनु.जाती व अनु.जमाती प्रवर्गातील शेतकऱ्याकरिता ९० टक्के पर्यंत अनुदान उपलब्ध आहे. या संधीचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा.



अनुदानाची मर्यादा खालील प्रमाणे आहे.शेतकरी वर्गवारी, राष्ट्रीय कृषि विकास योजना – प्रति थेंब,अधिक पिक योजना, मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना,बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना, डॉ.बाबासाहेब कृषि स्वावलंबन योजना. अनुदान–अल्प व अत्यल्प भूधारक (२ हे.पर्यंत क्षेत्र ) ५५ टक्के, २५ टक्के, १० टक्के, ९० टक्के, बहु भूधारक, (२ हे.पेक्षा जास्त क्षेत्र ) ४५ टक्के ३० टक्के १५ टक्के ९० टक्के.फायदे –१.ठिंबक तुषार घटकामुळे उत्पादनात व उत्पादकतेत मोठ्या प्रमाणात वाढ होऊन आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होते. २.पाण्याचा काटेकोर वापर झाल्याने तणांची वाढ रोखण्यास मदत होते.३.सिंचन क्षेत्रात वाढ होईल. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

# शाळा सुरू होण्यापूर्वी स्कूल वाहनांच्या फिटनेसवर प्रश्नचिन्ह; पालकांना सतर्कतेचे आवाहन : सोनवणे

बीड – दि. १२ जून २०२५: येत्या १६ जून २०२५ पासून राज्यभरातील शाळा पुन्हा सुरू होत असताना, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून स्कूल बस आणि व्हॅनच्या फिटनेस सर्टिफिकेटची तपासणी करण्याचे आवाहन पालकांना करण्यात आले आहे. बीडमधील नितीन सोनवणे ऑल इंडिया पँथर सेना महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते तथा जिल्हाध्यक्ष बीड या सामाजिक कार्यकर्त्यांनी यासंदर्भात आवाज उठवला असून, जुन्या आणि खराब झालेल्या वाहनांना शाळांसाठी परवानगी देऊ नये, सोनवणे यांनी अशी मागणी बीड व्हळ्ज कडे केली आहे.


पालकांना उद्देशून एका निवेदनात म्हटले आहे की, आपल्या मुलांच्या सुरक्षित प्रवासासाठी स्कूल वाहनांची योग्य देखभाल आणि वैध फिटनेस प्रमाणपत्र असल्याची खात्री करा. जुन्या वाहनांमुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. यासंदर्भात बीड व्हळ्ज ने कठोर नियम लागू करावेत आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, ऑल इंडिया पँथर सेना बीड च्या वतीने अशी मागणीही करण्यात आली आहे. अपघात किंवा कोणतीही हानी झाल्यास याची जबाबदारी बीड व्हळ्ज ची असेल, असा इशाराही देण्यात आला आहे बीड पोलिस आणि जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनाही याबाबत लक्ष घालण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी ऋर्ळीपशीी उर्शीलिक्षळलरींश या हॅशटॅगद्वारे सोशल मीडियावर जनजागृती सुरू केली आहे. पालकांनी आपल्या पाल्याच्या सुरक्षेसाठी सतर्क राहावे आणि वाहनांची तपासणी करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

पालकांची भूमिका महत्त्वाची शाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर पालकांनी स्वतःहून स्कूल बस किंवा व्हॅनच्या कागदपत्रांची पडताळणी करणे गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित आणि निर्धास्त होईल, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. बीड व्हळ्ज कडून याबाबत कोणती पावले उचलली जाणार, याकडे बीड जिल्हात या गोष्टीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मूलभूत सोयी- सुविधांचा अभाव

### वीज उपकरणांची , शौचालयाची, दारे, खिडक्यांची दुरुस्ती, रंगरंगोटी करावी

बीड – तालुक्यातील लिंबागणेश येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्ण व नातेवाईकांसाठी आवश्यक असलेल्या मुलभूत सुविधांचा अभाव आहे. आरोग्य केंद्राच्या शस्त्रक्रिया गृहात लाईट नाही, शौचालय ब्लॉक झाल्याने वापर बंद आहे., दरवाजे, खिडक्या तुटलेल्या आहे. यामुळे रुग्णांची प्रचंडप्रमाणात हेळसांड होत आहे. याकडे प्रशासनाने लक्ष देवून दुरुस्ती करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे.



लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे ३७ वर्ष जुने आहे. लिंबागणेश व परिसरातील १५ गावच्या नागरिकांसाठी मोफत आरोग्याची सुविधा देणाऱ्या या रुग्णालयास मागील काही दिवसांपासून अवकळा आली आहे. मुख्यइमारत ही जिर्ण झालेली असल्याने पावसाळ्यात छताला गळती लागते. यामुळे रुग्णांची तारांबळ उडते. शस्त्रक्रिया कक्षात विद्युतीकरण करण्यात आले नसुन उपकरणे नादुरुस्त आहेत. रुग्णालयातील शौचालय ब्लॉक झाल्याने त्याचा वापर बंद झाला असुन रुग्ण व नातेवाईकांची प्रचंड गैरसोय होत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राचा विद्युत पुरवठा सातत्याने खंडीत होतो. त्याच प्रमाणे कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाचीही दुरावस्था झाली असुन त्याचीही दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. परिचर ५ मंजुर पदांपैकी केवळ २ पदे भरली असुन उर्वरीत रिक्त ३ पदे त्वरीत भरावीत अशी मागणी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य इमारत आणि निवासस्थानी असणाऱ्या असुविधा जसे की पावसाळ्यात छताची गळती, शस्त्रक्रिया गृहात ई इतर ठिकाणी नादुरुस्त लाईट फिटींग, वारंवार खंडित विद्युत पुरवठा, टॉयलेट आउटलेट साठी सिमेंट टाकी नसल्यामुळे टॉयलेट ब्लॉक झालेला आहे. दारे खिडक्या तुटलेल्या अवस्थेत असुन रंगरंगोटीची आवश्यकता असल्याचे पत्रद्वारे जिल्हा आरोग्य अधिकारी बीड यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

# ना.पंकजा मुंडे यांचे देशी गोवंश संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल

### २२ जुलै हा दिवस शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिन म्हणून साजरा होणार

मुंबई – राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी देशी गायींच्या संवर्धनासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, दरवर्षी २२ जुलै हा दिवस शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा अध्यादेश सरकारने निर्गमित केला आहे.

यापूर्वीच देशी गायीस राज्यमाता–गोमाता म्हणून घोषित करण्यात आले असून, या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात मराठवाडा विभागात देवणी, लालकंधारी. पश्चिम महाराष्ट्रामध्ये खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी तर विदर्भात गवळाऊ यांसारख्या देशी गायींच्या जाती आढळतात. मात्र, कमी उत्पादनक्षमता व प्रजननक्षमतेमुळे या गायींच्या संख्येत सातत्याने घट होत चालली आहे. यामुळे त्यांचे जतन व संवर्धन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर, देशी गायींचे जतन व संवर्धन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करून अधिक उत्पादनक्षम देशी गायी तयार करण्याचे उद्दिष्ट शासनाने घेतले आहे. यासोबतच देशी गायींच्या दुधाचे, शेणाचे, गोमुत्राचे उत्पादन व विपणन यासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन साजरा करताना चर्चासत्रे, शिबिरे, प्रदर्शने व विविध स्पर्धा यांचा समावेश असलेल्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. राज्य शासनाच्या आयुक्त, पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या संयुक्त विद्यमाने या दिवसाचे आयोजन करण्यात येणार असून, यासाठी लागणारा खर्च गोसेवा आयोगाच्या निधीतून करण्यात येणार आहे.

राज्यातील देशी गोवंशाच्या जतनासाठी व लोकजागृतीसाठी शासनाने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह ठरत असून, स्थानिक देशी गायांच्या संवर्धनासाठी एक सकारात्मक पाऊल असल्याचे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

हे पत्रक संपादक, मुद्रक, मालक व प्रकाशक अभिजीत नानासाहेब जगताप यांनी योगेश्वरी मुद्रणालय, अंबाजोगाई येथे छापून दैनिक विवेक सिंधु कार्यालय, नगर परिषद व्यापारी संकुल (संकुल क्र.४३,४४) अंबाजोगाई पिन–४३१५१७ जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले आहे. संस्थापक संपादक – प्रा.नानासाहेब गाठाळ ❋ संपादक- अभिजीत जगताप ❋ वृत्तपत्राचा नोंदणी क्र.६५७८८/८५ ❋ फोन–२४७२७०, मो :–९७६४०३३१११,९७६५५०००८८

## मुरमा शिवारातील...पान ४ वरून

करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे. या शेतकऱ्याने आत्महत्या का केली हे अद्यापही स्पष्ट झालेलं नाही. याविषयी अधिक माहिती अशी की, मुरमा शिवारातील नेमाने वस्ती येथील बंडू नेमाने यांची मुरमा, ता.पैठण शिवारातील गट क्रं १९५/४ मध्ये शेती आहेत.

शेती कसून आपल्या कुटुंबाचा उदारनिर्वाह चालवत होते. गुरुवारी सकाळी घरून कोणाला काही न सांगता ते आपल्या शेतामध्ये गेले, सकाळी ११ वाजेच्या दरम्यान घरातील नातेवाईक शेतामध्ये शेतात पाहणी करण्यासाठी गेले असता. त्या ठिकाणी बंडू नेमाने याने शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेतल्याचे निदर्शनात आले. यावेळी , त्यांनी या घटनेची माहिती तात्काळ शेजारी असणाऱ्या शेतकऱ्यांना दिली, यावेळी त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी बंडू नेमाने याने शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेतल्याचे निदर्शनात आले. यावेळी , त्यांनी या घटनेची माहिती तात्काळ शेजारी असणाऱ्या शेतकऱ्यांना दिली, यावेळी त्यांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन बंडू नेमाने यास फासावरून खाली घेऊन तातडीने पाचोड येथील ग्रामीण रुग्णालय उपचारासाठी दाखल केला असता वैद्यकीय अधिकारी डॉ. बाबासाहेब घुगे यांनी त्यास मृत घोषित केले.

या घटनेची नोंद पाचोड पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पंडीत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गोविंद राऊत, गणेश रोकडे हे करीत आहेत.

## वादळी पावसाने नुकसान....पान ४ वरून

घेतले जाते. शेतकरी वर्ग उन्हाळी कांदा काढून तो वाळवून भुसारा भरुन ठेवतात परंतु मे महिन्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आणि या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या कांद्याचे प्रचंड नुकसान झाले. अक्षरशः कांदा शेतात साचलेल्या पाण्यात भिजून त्याचा चिखल झाला. निसर्गाने हातातोंडाशी आलेला घास हीराऊन घेतला. त्याच कांदा विक्रीतून शेतकरी पुढील हंगामातील बी, बियाणे, खते तसेच पाळी – पेरणी यांचे नियोजन करतो, तसेच लेकरांच्या शिक्षणासाठी लागणारा खर्चही त्यावर अवलंबून होता.

पावसाने कांद्या बरोबर फळबागांचे प्रचंड नुकसान झाले . येत्या महिन्याभरात तोडणीसाठी आलेल्या डाळिंब बागा उन्मळून पडल्या आहेत तसेच आंबा पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. मे महिन्यातील अवकाळी पावसाने शेतकऱ्यांना शेतीच्या मशागतीही करता आल्या नाहीत. काही शेतकऱ्यांचा पावसाने झोडपलेला कांदा कवडीमोल भावाने विकला गेला. वादळात विजेचे खांब व तारा तुटल्याने सर्वत्र विज पुरवठा खंडीत झालेला आहे.

विज नसल्याने पिण्याच्या पाणी प्रश्न तसेच जनावरांचा पाणी प्रश्न गंभीर बनला आहे. या भागात दुध व्यवसाय मोठा आहे त्यामुळे अनेक शेतकऱ्यांकडे गाईचे गोठे असुन त्यामध्ये जास्त संख्येने गाई आहेत त्यांना लागणारा चारा बारीक करण्यासाठी विजेची आवश्यकता आहे तसेच त्यांना पाणी भरपूर लागते. तीन चार दिवसांपासून विज पुरवठा सुरळीत नसल्याने शेतकऱ्यांना तसेच व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात समस्यांना सामोरे जावे लागते आहे. विज पुरवठा बंद असल्याने स्वयंपाक घरातील पिठापासून अनेक समस्यांना निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे महावितरण कंपनीने विज पुरवठा दोन दिवसांत सुरळीत करावा. वादळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या घरांचे, कांदा चाळी, जनावरांचे गोठे यावरील पत्रे उडून गेले आहेत. तसेच फळबागां आणि कांदा व इतर पिकांचे झालेले नुकसान यांचे फक्त पंचनामे न करता शासनाने पंधरा दिवसांच्या आत पिडीत शेतकऱ्यांच्या खात्यात आर्थिक मदत जमा करावी नसता आष्टी मतदारसंघातील पिडीत शेतकऱ्यांना घेऊन आष्टी तहसीलवर प्रचंड प्रमाणात मोर्चा काढला जाईल असा इशारा माजी आमदार भीमराव धोंडे यांनी दिला आहे.

## बीड शहर... पान ४ वरून

नवनीत कॉवत यांनी पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करीत पाठीवर कौतुकाची थाप मारली आहे. तर बल्लाळ यांनी ही माझ्या एकट्याचा नव्हे तर ठाण्यातील सहकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

## कीड व रोगावर...पान ४ वरून

कार्यक्रमाविषयी माहिती दिली. कार्यक्रमास संत सावता शेतकरी बचत गटातील सदस्य सुनिल ससाणे, आसाराम ससाणे, प्रल्हाद ससाणे, देविदास ससाणे, अमोल ससाणे, अरुण भाडंवलकर यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

### अशी करा बीजप्रक्रिया

रासायनिक बुरशीनाशकाची प्रक्रिया शिफारशीनुसार करावी. त्यासाठी साधारणत: ३ ग्रॅम थायरम अथवा कार्बेन्डेझीम ३ ते ४ ग्राम प्रति किलो बियाण्यास घेऊन चोळावे. थायरम लावत असताना अंगाला खाज सुटणे व डोळे लाल होणे यासारखे लक्षणे दिसू लागतात. ते टाळण्यासाठी हातामध्ये रबरी किंवा प्लॅस्टिकचे हातमोजे वापरावे. सर्वप्रथम रासायनिक बुरशीनाशकाची बिजप्रक्रिया करावी. त्यानंतर कीटकनाशकाची बिजप्रक्रिया करावी. त्यात थायोमिथाझ्याईम २५ टक्के एफएस ४ मिली प्रति किलो बियाणे या प्रमाणे करावी. सर्वात शेवटी जिवाणू संघ अथवा ट्रायकोझ्मा २५ ग्रॅम प्रति १ किलो बियाणे व लिक्विड असेल तर ५ मिली यानुसार, पी.एस.बी. ची बीजप्रक्रिया करावी.

### बीजप्रक्रियेचे फायदे

जमिनीतून व बियाण्याद्वारे पसरणार्या रोगांचा प्रादुर्भाव टाळता येतो. बियाण्यांची उगवण क्षमता वाढते. रोपे सतेज व जोमदारपणे वाढतात. पिकाच्या उत्पादनात वाढ होते. बीजप्रक्रियेस कमी खर्च येतो.

## विनाअनुदानित शाळेतील... पान ४ वरून

शाळांना १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेश्याशानुसार वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आवश्यक निधीची तरतूद करावी अशी मागणी करण्यात आली.यावेळी विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी बोलताना धनंजय मुंडे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांच्या व्यथावेदना याची मला जाणीव आहे. कित्येक दिवसापासून नव्हे तर वर्षापासून बिना पगारी काम करताना काय वेदना असतात. त्यांच्या घरची परिस्थिती कशी असते, याची मला चांगली जाणीव आहे.

त्यामुळे आपल्या सर्व मागण्या रास्त असून या रास्त मागण्या विधिमंडळात मांडून येत्या पावसाळी अधिवेशनात टप्पा वाढीसाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करून निधीची तरतूद व्हावी यासाठी प्रयत्न करणार आहे. जोपर्यंत टप्पा वाढीसाठी आवश्यक निधीची तरतूद होत नाही. तोपर्यंत पाठपुरावा सुरू ठेऊन तुमचा प्रश्न मार्गी लावतो असे आश्वासन माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी विना अनुदानित शाळा कृती समितीचे अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करून निधीची तरतूद व्हावी यासाठी प्रयत्न करणार आहे. जोपर्यंत टप्पा वाढीसाठी आवश्यक निधीची तरतूद होत नाही. तोपर्यंत पाठपुरावा सुरू ठेऊन तुमचा प्रश्न मार्गी लावतो असे आश्वासन माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि जेष्ठ समाज–सेवक डॉ. संजय तांदळे यांना दिले. त्यामुळे येत्या पावसाळी अधिवेशनात वाढीव टप्प्याच्या निधीची तरतूद होऊन खूप दिवसांपासून टप्पा वाढीचा अस–लेला हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याचे संकेत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या पाठोपाठ माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिल्याने विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यात चैतन्याचे वातावरण तयार झाले आहे.

## आशा स्वंयसेविका... पान ४ वरून

की, गेल्या पाच महिन्यांपासून मानधन न मिळाल्यामुळे अनेक आशा व गटप्रवर्तकांना उपासमारीची वेळ आली आहे. काही महिलांना घर चालवण्यासाठी कर्ज काढावे लागत आहे, तर काहींना दौऱ्याच्या खर्चासाठी उसनवारी करावी लागत आहे. राज्य शासनाकडून एप्रिल २०२५ चे मानधनाचा निधी जिल्हा प्रशासनास प्राप्त झालेला असूनही तो अद्याप वितरीत झालेला नाही, ही बाब विशेष चिंतेची असल्याचेआंदोलकांचे म्हणणे आहे. बायोमेट्रिक हजेरीची सक्ती, प्रधानमंत्री मातृवंदना योजनेतील थकीत मोबदला, तसेच ऑनलाईन कामांसाठी आवश्यक मोबाईल, सिम कार्ड व रिचार्जसाठी शासनाकडून कोणतीही सुविधा दिली जात नसल्याच्या तक्रारीही यावेळी मांडण्यात आल्या.

गटप्रवर्तकांकडून कोणते नोंदी व कागदपत्रे मागवायचे याबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना न दिल्याने गोंधळ निर्माण झाला आहे. त्यामुळे त्यांच्या कामाच्या स्वरूपात सुसूत्रता आणण्यासाठी आशा डायरीप्रमाणे रेकॉर्ड डायरी देण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. तसेच वेतन चिठ्ठी नियमितपणे देण्यात यावी आणि दर तीन वर्षांनी गटप्रवर्तकांकडील रेकॉर्ड तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात जमा करण्याची प्रक्रिया राबवावी, अशी मागणीही यावेळी मांडण्यात आले.

## बोगस काम करणाऱ्या... पान ४ वरून

असताना देखील काम सुरू ठेवण्यात आले, जे नियोजनाविरोधी आहे. ड्रॉइंग व अंदाजपत्रकानुसार पाईपलाईन करण्यात आलेली नाही, तसेच पाईपलाईन चुकीच्या मार्गाने टाकण्यात आलेली आहे.

पाईपलाईन रस्त्यात लागणाऱ्या दुसऱ्या तलावातून मधोमध टाकण्यात आलेली आहे, त्यामुळे भविष्यात तलाव भरल्यावर देखभाल करणे अशक्य होईल. यापूर्वी देखील चौकशी झाली असून चौकशी समिती ला सर्व गोष्टी प्रत्यक्ष निर्दशनास आणून दिल्या असताना देखील कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. चौकशी अहवालात अर्थपूर्ण व्यवहार करून चुकीची माहिती देण्यात आली आहे, यावरून शासकीय यंत्रणाच कंत्राटदार यांना खतपाणी घालण्याचे काम करत आहे असच पाहायला मिळत आहे.सध्या देखील पाईपलाईन वाहून गेली आहे; पैलाईन किती खोदली कुठून टाकली कशाप्रकारे कशी वाहून गेली रस्ते कशे उखडून ठेवले आहेत याच्या फोटो सह माहिती उपलब्ध आहे,म्हणजे काम अद्याप पूर्णही झालेले नाही तरच पाईपलाईन वाहून जात आहे.

त्यावरून कामाचा दर्जा आपण समजू शकतो. नकली, आयएसआय नसलेले पाईप वापरण्यात आले आहेत. अंदाजपत्रक नुसार कोणतेही काम झालेले नाही, ग्रामपंचायत प्रशासन तसेच सरपंच यांना संपर्क साधला असता असे समजले कि ग्रामपंचायत ला कसल्याही प्रकारे विश्वासात घेऊन काम केले गेले नाही,उलट ग्रामपंचात ची तक्रार असताना देखील बिले दिले आहेत, तसेच माहितीच्या अधिकारात सद्धा नसलेले अंदाजपत्रक दिले गेले, यावरून बिले देखील बनावट पद्धतीने दिली असावीत अशी शंका आहे. श्री. आंधळे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, बीड यांनी चुकीची माहिती दिली आहे, म्हणून त्यांच्या विरोधातही तात्काळ कारवाई व्हावी अशी देखील मागणी उजगरे यांनी केली आहे. वरील सर्व बाबी गंभीर असून, सदर कामात कंत्राटदार व संबंधित अभियंता यांची साठगाठ दिसून येते. तरी या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी

अशी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी जि बीड यांच्याकडे करण्यात आली आहे, कार्यवाही न झाल्यास पुढील १५ दिवसांच्या आत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्यात येईल अशी माहिती तक्रारदा प्रकाश उजगरे यांनी माध्यमांशी सवांद साधना सांगितले आहे.

## केजची आदर्श...पान ४ वरून

चिखल होत असून त्यातून नागरिकांना वागावे लागत आहे. तर नाली नसल्याने सांडपाणी साठून राहत असून रस्त्यावर पसरत आहे. त्यामुळे रस्ता कोरडा राहत नसून रस्त्यावर तळे साचत आहे. साठून राहिलेल्या सांडपाण्यामुळे दुर्गंधी पसरत असून मच्छर, डासांची उत्पत्ती होत आहे. त्यामुळे या भागातील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दरम्यान, पावसाळा सुरू झाला असून पावसाचे पाणी रस्त्यावर व खोदलेल्या नालीत साठून राहू लागल्याने या भागात अस्वच्छता पसरली आहे. त्यामुळे या भागात तात्काळ रस्ता व नाल्यांची कामे करण्याची गरज निर्माण झाली. नगरपंचायतीकडून रस्ता व नाल्यांची कामे केली जात नसल्याने नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे. याची दखल घेऊन पदाधिकाऱ्यांनी रस्ता व नालीचे काम तात्काळ हाती घेऊन या भागात मूलभूत सुविधा पुरवून जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

### नगराध्यक्षांच्या प्रभागात आदर्श कॉलनी

नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सीता बनसोड या प्रभाग क्र. ७ मधून निवडून नगराध्यक्षा झाल्या. याच प्रभागात आदर्श कॉलनी हा भाग येत असून त्यांच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात रस्ता व नालीचा प्रश्न सुटला नसून त्यांना आणखी अडीच वर्षाचा कार्यकाळ वाढवून मिळाला आहे. त्यामुळे रस्ता व नालीचा प्रश्न सोडवतील, अशी अपेक्षा ही नागरिकांतून व्यक्त केली जात आहे.

## आशा स्वंयसेविका... पान ४ वरून

राज्यात वेगाने आगेकूच केली असून अनेक जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. शेतकऱ्यांसाठी ही दिलासादायक स्थिती मानली जात आहे.

### पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज

पुढील दोन दिवसांत महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात विजांच्या कडकडाटासह मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. घाटमाथ्यावर काही ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर परिसरात पावसाच्या सरी कायम राहतील. विदर्भात काही भागांत यलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पावसामुळे पेरणीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

### कोकणात जोरदार सुरुवात

कोकण किनारपट्टीवर मान्सूनने नेहमीप्रमाणेच जोरदार सुरुवात केली आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि पालघर जिल्ह्यांमध्ये गेल्या आठवड्यात सतत पावसाची नोंद होत असून अनेक ठिकाणी १०० मिमी पेक्षा जास्त पाऊस पडला आहे. मुंबईतही १२ जूनपासून पावसाने दमदार हजेरी लावली असून गुरुवारी (१३ जून) शहरात ८० मिमी तर उपनगरात ११० मिमी इतकी पावसाची नोंद झाली. त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीस अडथळे आले असून बेस्टच्या काही बस सेवा विलंबाने धावत आहेत.

### मध्य महाराष्ट्रात समाधानकारक पावसाची नोंद

नाशिक, पुणे, सातारा, सोलापूर, अहमदनगर या जिल्ह्यांमध्येही मान्सून सक्रिय झाला आहे. काही ठिकाणी पावसाची संततधार असून, शेतकऱ्यांनी पेरण्या सुरू करण्याची तयारी केली आहे. हवामान विभागाने सांगितले की, पुढील पाच दिवस मध्य महाराष्ट्रात विजांसह मध्यम ते जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

### मराठवाड्यातही दिलासा

मराठवाडा हा पावसाच्या दृष्टीने कायमच असमाधानी राहिलेला भाग मानला जातो, मात्र यंदा मान्सूनची वेळेत एन्ट्री झाली आहे. छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी, लातूर आणि नांदेडमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू असून शेतकऱ्यांमध्ये आशा निर्माण झाली आहे. काही भागांत शेतकरी खत–बियाण्यांची खरेदी करत असल्याचे दिसून येत आहे.

### विदर्भात पावसाची चांगली सुरुवात

विदर्भातील नागपूर, अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ, गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांत जोरदार पावसाने सुरुवात केली आहे. यवतमाळ जिल्ह्यात काही भागांत पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. नागपूरमध्ये१३ जूनला ७५ मिमी पावसाची नोंद झाली. भारतीय हवामान विभागाने यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर येथे यलो अलर्ट जारी केला आहे.

### धरण साठ्यांमध्ये हळूहळू वाढ

राज्यातील प्रमुख धरणांमध्ये अद्याप मोठ्या प्रमाणात पाणीसाठा झाला नसला तरी सुरुवातीचा पाऊस समाधानकारक ठरत आहे. कोयना, उजनी, जायकवाडी, भातसा, मुळा, पानशेत या धरणांमध्ये पाणी साठ्यात वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. जलसंपदा विभागाने सांगितले की, पावसाची ही सुरुवात अशीच नियमित राहिली तर पुढील काही आठवड्यांत पाणीटंचाईच्या भीतीतून दिलासा मिळू शकतो. हवामान खात्याचा पुढील अंदाजभारतीय हवामान खात्यानुसार पुढील ५–७ दिवस राज्यात वाऱ्याच्या वेगासह पावसाची शक्यता आहे. विदर्भात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज असून, नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कोकण व घाटमाथ्यावर दरड कोसळण्याचा धोका लक्षात घेता पर्यटनासाठी गेलेल्या नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी थांबावे, असेही सांगण्यात आले आहे.

पावसाच्या आगमनानंतर राज्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी तयारी सुरू केली आहे. बी–बियाण्यांची दुकाने गर्दीने भरली असून शेतकऱ्यांनी नांगरणी, टोकणीची कामे वेगाने सुरू केली आहेत. कृषी विभागाने शेतकऱ्यांना सल्ला दिला आहे की, पुढील चार–पाच दिवस पावसाची स्थिती पाहून पेरण्या कराव्यात जेणेकरून पिकांचे नुकसान होणार नाही.एकूणच पाहता, यंदा मान्सूनने वेळेवर महाराष्ट्रात प्रवेश केला असून, सर्वच भागांत समाधानकारक पावसाची नोंद होत आहे. राज्यातील शेतकरी, प्रशासन व नागरिक यांच्यासाठी ही सुखद बातमी असून आगामी दिवसांत पावसाचे प्रमाण असेच कायम राहिल्यास राज्याला यंदा चांगला खरीप हंगाम अनुभवता येईल, अशी अपेक्षा आहे. मात्र हवामान बदलांचा परिणाम लक्षात घेता सततची सतर्कता व नियोजन आवश्यक राहील.

दै.विवेक सिंधु | दि.१५/०६/२०२५

**CHANGE IN NAME**

I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

**OLD NAME**

SHAIKH EJAJ SHAIKH DASTAGIRI

**NEW NAME**

EJAJ DASTAGIRI SHAIKH
ADDRESS 6/671/1 OPPOSIT
PANCHAYAT SAMITI OFFICE AMBAJOGAI BEED
431517-MAHARASHTRA

## चाकरवाडीत सांगता... पान ४ वरून

त्याअनुषंगाने धनंजय मुंडे यांनी त्यांचे आभार मानले. त्याचबरोबर शिवमहापुराण कथेचे वाचन प्रदीपजी मिश्रा व ह.भ.प. महादेव महाराज यांचे दर्शन मुंडे यांनी या वेळी घेतले. कथेला दुपारी एक वाजता सुरुवात झाली आहे. लाखोंच्या संख्येने भक्तगण चाकरवाडीत डेरेदाखल आहेत.

संतशिरोमणी वै. ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या रौप्यमहोत्सवी पुण्यतिथीनिमित्त आयोजीत अखंड हरिनाम सप्ताह तसेच शिवमहापुराण कथेचा आज सांगता सोहळा चाकरवाडीमध्ये मोठ्या उत्साहात पार पडत आहे. लाखोंच्या उपस्थितीत भक्तगण चाकरवाडीत डेरेदाखल असून सांगता सोहळ्यात या सप्ताहाचे काल्याचे कीर्तन ह.भ.प. संदीपान महाराज हसेगावकर यांच्या वाणीतून झाले. या वेळी महाराजांनी 'गोड लागे परी सांगताची नये, बैसे

मिठी सये आवडीची वेधले ओ येणे श्रीरंग रंगे, मी माझी अंगे हरवली'

ही गवळण घेत हसेगावकर महाराजांनी त्याचे विवेचन करताना माऊली महाराज वारकरी संप्रदायाचे उच्चकोटीचे महात्म्ये होते, हे सांगताना माऊली महाराजांचे कार्य, त्यांचे संदेश उपस्थित भक्तांना सांगितले. काल्याच्या कीर्तनाचे महत्व आणि ईश्वरप्राप्ती कुठे आणि कसे मिळते हे सांगितले. दुपारच्या सत्रात शिवमहापुराणाचे वाचन प्रदीपजी मिश्रा यांची कथा सुरू होती. दरम्यान, आज राष्ट्रवादीचे नेते माजी मंत्री धनंजय मुंडे हे चाकरवाडीमध्ये डेरेदाखल आहेत. त्यांनी सर्वप्रथम माऊली महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी कथास्थळी येत ह.भ.प. महादेव महाराज आणि महाशिवपुराण कथा वाचक प्रदीपजी मिश्रा यांचे दर्शन घेतले. आज या सप्ताहाच्या सांगता सोहळ्याची महापंगत ही परळीकरांची असून सोहळ्याच्या अंतिम दिवशी महापंगतीला महाप्रसाद देण्याचामान आयोजकांनी आपल्याला दिला, याबद्दलधनंजय मुंडे यांनी आभार मानले.

## पाचवी वर्गातील...पान १ वरून

गुरुवारी अटक वॉरंट निघाल्याचे पत्नीने सांगितले होते. दुसरी पत्नीही त्याच्या नात्यातील असून, तिला मुलगा आहे. अगोदर दोन बायका असतानाही सुलेमान याने अवघ्या १३ वर्षांच्या मुलीसोबत तिसरा विवाह केल्याचे सांगण्यात आले. यांना मिळाली. त्यांनी लगेच पोलिस यंत्रणेशी संपर्क साधून त्यांना बार्शी रोडवर पकडले. या सर्वांना शिवाजीनगर पोलिस ठाण्यात आणल्यावर रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला. यातील पीडितेला बालकल्याण समितीसमोर हजर केले जाणार आहे. अध्यक्ष अशोक तांगडे हेदेखील पोलिस ठाण्यात पोहोचले होते. गुरुवारीच प्रशासनाने सहकार्य केले नाहीबालविवाहाची माहिती मिळताच पोलिसांना सांगितले. पाचवीच्या वर्गातील मुलीचे दोन विवाह झाल्याचे समोर आले. परंतु, यात गुन्हा दाखल करण्यासाठी प्रशासनाने सहकार्य केले नाही. टोलवाटोलवी केली. अशाने बालविवाह कसे थांबतील, हा प्रश्न आहे.

## नुकसानग्रस्तांना दिलासा...पान ४ वरून

गावातील नागरिकांचे घरांची पडझड झाली असून आणि काही शेतकऱ्यांचे कुकुटपालन शेड, गोठे, आणि जनावरांची जीवित हानी झाली आहे. आष्टी तालुक्यातील पिंपरीआष्टी, बेलगाव, मुर्शदपूर, किन्ही, बावी, कापशो यासह पाटोदा तालुक्यातील अंमळनेर, डागाची वाडी, ठंडेवाडी, कोतन, पांढरवाडी, गांधणवाडी, साबळेवाडी, इतर गावांमध्ये अनेक ठिकाणी विजेचे खांच कोसळून तारा तुटल्या आहेत. त्यामुळे सध्या विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. या गावांना भेटीत देऊन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आमदार सुरेश धस यांनी दिलासा दिला आहे.शेतकऱ्यांनी देखील आमदार सुरेश धस हे बांधावर आलेल्या आधार मिळाल्याच्या भावना व्यक्त केले आहेत. तर सकाळीच महावितरण विभागाचे कार्यकारी अभियंता डोंगरे, कनिष्ठ अभियंता, तहसीलदार, नायब तहसीलदार, तलाठी, कृषी विभागाचे अधिकारी, गट विकास अधिकारी ग्रामसेवक आणि गावातील प्रमुख कार्यकर्ते यांची तातडीने बैठक घेतली. यामध्ये काल झालेल्या पावसामुळे नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. तसेच प्रशासनाने अत्यंत काळजीपूर्वक शेतकरी आणि नागरिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश महसूल आणि कृषी कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत. तरीही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी नुकसानी बाबतचे फोटो काढून प्रशासनाशी संपर्क साधावा शासनाकडून नुकसान भरपाई साठी आपण प्रयत्न करणार आहोत असे त्यांनी शेवटी सांगितले.

या पाहणी दरम्यान माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, माजी जि. प. माऊली जरांगे, भाऊसाहेब भवर, सरपंच अशोक मुळे, इंद्रजीत गर्जे, अश्रूबा गोल्हार, कारभारी गर्जे, बाबू गर्जे, अशोक जेथे, महेश खेगरे, दादा बेदरे, पाचपुते मुकादम, गाडे सरपंच, पिनू पोकळे, अमोल पोकळे, बाळासाहेब सकुंडे, भाऊसाहेब ससे, तहसीलदार निलावड साहेब, कृषी अधिकारी पवार साहेब, राख साहेब, विस्तार अधिकारी, ग्राम विकास अधिकारी मंडळ अधिकारी तलाठी व कृषी सहाय्यक यांच्यासह महेश खेगरे, दादा वेदरे, पाचपुते मुकादम, गाडे यांच्यासह संबंधित कृषि विभाग, महसूल विभाग व बांधकाम विभाग उपस्थित होते.

वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांचे आंबा, उन्हाळी कांदा, कुकुट पालनाचे शेड, विजेचे खांब कोसळून तारा तुटल्या आहेत वादळाचा वेग मोठा असल्यामुळे जुने मोठे वृक्ष उन्मळून पडले आहेत प्रशासनाकडून नुकसानीबाबत पंचनामे सुरू झाले आहेत तरीही कोणी बंचित राहू नये म्हणून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी नुकसानी बाबतचे फोटो काढून प्रशासनाकडे देण्यात यावेत शासनाकडून शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.

## मुरमा शिवारातील नेमाणे वस्ती येथे एका ३५ वर्ष शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

पाचोड – पैठण तालुक्यामधील मुरमा शिवारामध्ये राहणाऱ्या नेमाने वस्ती येथील एका ३५ वर्षीय शेतकऱ्यानी स्वतःच्या शेतामध्ये लिंबाच्या झाडाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवार (दि.१२)रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास उघडकीस आली असून बंडू आसाराम नेमाने असे आत्महत्या

पान ३ वर

दैनिक

# विवेक सिंधु

रविवार, दि.१५ जून २०२५



## बोगस काम करणाऱ्या संस्था काळ्या यादीत टाका : प्रकाश उजगरे

बीड – कोट्यावधी रुपये खर्च करून राबवल्या जाणाऱ्या जलजीवन मिशन योजनेअंतर्गत केल्या जाणाऱ्या मौजे मोरवड गावात झालेली पाणीपुरवठा योजना पूर्णपणे बोगस केली आहे, मौजे मोरवड येथे जलजीवन योजनेअंतर्गत करण्यात आलेले काम पूर्णपणे बोगस व निकृष्ट दर्जाचे आहे. सदर योजनेतील अनेक गंभीर त्रुटी आहेत,सोर्स फेल

पान ३ वर

## जागतिक रक्तदान दिनाचे औचित्य साधून पोदार इंटरनॅशनल स्कूल मध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन




अंबाजोगाई (प्रतिनिधी)–पोदार इंटरनॅशनल स्कूल अंबाजोगाई येथे 'स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालय अंबाजोगाई,' यांच्या वतीने डॉ. अक्षय कदम व त्यांचे सहकारी कर्मचारी यांनी रक्तदान शिबिराचे व्यवस्थापन केले.

पोदार इंटरनॅशनल स्कूल दरवर्षीच रक्तदान शिबिराचे आयोजन करते. यामध्ये शालेय पालकांचा,शिक्षकांचा व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग असतो. शाळेचे प्राचार्य श्री. किर्तीकुमार देशमुख सर यांनी सर्वांना रक्तदानाचे महत्त्व सांगून रक्तदान करण्याचे आवाहन केले. या रक्तदान शिबिर कार्यक्रमास लाभलेल्या प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सर्व कर्मचाऱ्यांचे व शालेय प्रशासकीय अधिकारी श्री.प्रताप रसाळ सरांचे शाळेच्या वतीने आभार व्यक्त केले.

## नुकसानग्रस्तांना दिलासा देण्यासाठी आ.धस शेतकऱ्यांच्या बांधावर

### नुकसानीचे पंचनामे तत्काळ करण्याचे प्रशासनाला आदेश



आष्टी – राज्यभरात मान्सून दाखल होत असताना दि. ११ रोजी अचानक झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांना तडाखा बसला आहे. जोरदार झालेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या फळबागा आणि इतर पिकांचे नुकसान झाले असून वीज पुरवठा खंडित झाला आहे.

या नुकसानग्रस्त भागातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आमदार सुरेश धस शेतकऱ्यांच्या बांधावर प्रशासनाला समवेत घेऊन पोहोचले आणि प्रशासनाला सूचना देऊन नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्याचे आदेश दिले आहेत.

दि.११ जून रोजी सायंकाळी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या फळबागांची फार मोठे नुकसान झाले आहे. तसेच अनेक

पान ३ वर

## सपना चौरेंची एसबीआय बँकेच्या सहाय्यक पदी निवड



केज – जिवाचीवाडी येथील सपना मोकिंदा चौरे यांनी एसबीआय बँकेच्या सहाय्यक पदाच्या परीक्षेत यश मिळविले असून त्यांची या पदावर निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांनी सत्कार केला.

जिवाचीवाडी येथील सपना मोकिंदा चौरे यांनी सर्जापूर येथे प्राथमिकचे शिक्षण आणि टेक्निकलचे शिक्षण पूर्ण करीत आहिल्यानगर येथील विखे पाटील महाविद्यालयातून इंजिनिअरिंगची पदवी पूर्ण केली होती. आयबीपीएस मार्फत घेण्यात आलेल्या एसबीआय बँकेच्या सहाय्यक पदाच्या परीक्षेत यश मिळविले. सपना चौरे यांची एसबीआय बँकेच्या सहाय्यक पदावर निवड झाल्याबद्दल तिचा, तिचे पती व आई – वडिलांचा गावकऱ्यांनी सत्कार केला. यावेळी भागवत चौरे, वसुदेव चौरे, श्रीराम चौरे, चांगदेव चौरे, अनंता चौरे, पिंटू महाराज चौरे, अंकुश चौरे, अनिल कांदे, विष्णू चौरे, विक्रम चौरे, रामा चौरे, आबा चौरे, दिपक चौरे, उत्तरेश्वर चौरे, विनोद चौरे, श्रीराम कुटे हे उपस्थित होते.

## आशा स्वंयसेविका व गटप्रवर्तकांचे जिल्हा परिषदेसमोर धरणे



बीड – जानेवारी २०२५ पासून पाच महिन्यांचे मानधन थकीत असल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांनी अखेर रस्त्यावर उतरून आपल्या मागण्यांसाठी लढा पुकारला आहे.

महाराष्ट्र राज्य आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक महासंघाच्या वतीने १३ जून २०२५ रोजी बीड जिल्हा परिषदेसमोर दुपारी १२.३० वाजता धरणे आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू होते.

या आंदोलनाच्या निमित्ताने शासनाच्या दिरंगाईविरोधात संतप्त भावना व्यक्त करताना संघटनेचे प्रदेशाध्यक्ष भगवान देशमुख,प्रदेश कार्याध्यक्ष कमल बांगर, राज्य संघटक दत्ता देशमुख, आणि जिल्हाध्यक्ष सचिन आंधळे यांनी सांगितले

पान ३ वर

## केजची आदर्श कॉलनी मूलभूत सुविधांपासून वंचित

### रस्ता, नाल्याची कामे करण्याची गरज



केज – केज शहरातील आदर्श कॉलनी हा भाग नगरपंचायतीच्या प्रभाग क्र. ७ मध्ये येतो. या भागातील रस्ता व नाल्यांचा प्रश्न सुटलेला नसून ही कॉलनी मूलभूत सुविधांपासून वंचित राहिली आहे. आता पावसाळ्याच्या दिवसात रस्ता व नाली अभावी नागरिकांची अडचण झाली आहे. याची दखल घेऊन नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी रस्ता व नाल्यांची कामे करण्याची गरज आहे.

केज शहरातून मांजरसुंब्याकडे जाणाऱ्या रस्त्यालगत आदर्श कॉलनी असून हा भाग नगरपंचायतीच्या प्रभाग क्र. ७ मध्ये येतो. या भागातील रस्ता आणि नाल्यांचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. सिमेंट काँक्रेटचा रस्ता करण्यात आलेला नसल्याने रस्त्यावर

पान ३ वर

## शेतकऱ्यांनी खत बि-बियाणे खरेदी करताना कृषी दुकानादाकडुन पक्की पावती घ्यावी



केज (प्रतिनिधी)– खरीप पेरणीची लगबग सुरु झाली आहे, शेतकरी बी–बियाणे खरेदीसाठी लगबग करत आहेत, यापूर्वी अनेक बियाणे बोगस निघाले आहेत, बियाणे पेरले तर ते उगवलच नाही सावधगिरी म्हणून, खत बी–बियाणे घेताना शेतकऱ्यांनी पक्क्या पावत्या कृषी दुकानदाराकडून घ्याव्यात असे आव्हान भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते भाई मोहन गुंड यांनी केले आहे. मागील वर्षी खताचा तुटवडा दाखवून बेसुमार भवाने खत विक्री केल्याच्या घटना समोर आल्या होत्या, यावर्षी ही अनेक शेतकऱ्यांनी अनेक कृषी दुकानदाराच्या तक्रारी माझ्याकडे फोन द्वारे केल्या आहेत, मी दोन दिवसात जिल्हा कृर्षी कृषी अधिकाऱ्याची भेट घेणार आहे, मागील वर्षी सोयाबीनचे बियाणे उगवले नसल्यामुळे दुबार पेरणीची वेळ आली होती. पावत्या नसल्यामुळे कृषी दुकानदार नंतर शेतकऱ्याला बोलू देत नाहीत, म्हणून शेतकऱ्यांनी कृषी दुकानदाराकडून पक्की पावती घेतल्याशिवाय खत बी बियाणे खरेदीच करू नये, खत बियाण्याच्या एमआरपी पेक्षा अधिक पैसे कोणाला ही देऊ नयेत कोणी खत बी–बियाण्याचा तुटवडा करीत असेल, अधिक पैसे मागत असेल असेल, इतर काय अडचण असल्यास ९४ २३ ९७ ९४ ९२ या माझ्या नंबर वर संपर्क करावा असे आव्हान शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी प्रसिद्धी पत्रकात केले आहे.

## कीड व रोगावर नियंत्रण आणण्यासाठी सोयाबीन पिकांमध्ये बीज प्रक्रिया महत्त्वाची : योगेश पाटील

### केज तालुक्यात बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक कार्यक्रम



केज (प्रतिनिधी)– सोयाबीन पिकास पिवळा मोझ्याक खोडकीडा, खोडमाशी, पांढरी माशी, मावा, फुलकिडे, विषाणूजन्य रोग करपा हे कीड व रोग मातीमधील बुरशीमधून व बियाणेद्वारे होऊ शकतात. त्यासाठी बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे. शिवाय इतर पिकांच्याही बीजप्रक्रियेला महत्व द्यावे, असे आवाहन आत्माचे बीटीएम योगेश पाटील यांनी केले.

कृषि विभाग व आत्माच्या वतीने जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी तथा प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली व केजचे तालुका कृषि अधिकारी सागर पठाडे यांच्या नियोजनातून तालुक्यात बीजप्रक्रिया कार्यक्रम सुरू आहे. सोनीजवळा येथे आयोजित सोयाबीन बीजप्रक्रिया कार्यक्रमात योगेश पाटील हे बोलत होते. यावेळी सहाय्यक कृषि अधिकारी दत्ता नांदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना योगेश पाटील म्हणाले की, सोयाबीन अथवा इतर पिकांच्या पेरणी वेळेस बिजप्रक्रियेस फारसे महत्व दिले जात नाही. बीज प्रक्रिया ही जरी क्षुल्लक बाब असली तरी बीजप्रक्रिया केल्याने शेतकऱ्यांना मोठा फायदा होऊ शकतो. भविष्यात येणाऱ्या कीड व रोगांवर नियंत्रण आणण्यास बीज प्रक्रिया खूप महत्त्वाची आहे.

सोयाबिन बियाणे यास बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी. यामुळे बुरशीवर मात करता येते. असे मत मांडले. यावेळी सहाय्यक कृषि अधिकारी दत्ता नांदे यांनी कृषि विभागाच्या ३० कलमी

पान ३ वर

# जाहीरनामा

श्री.योगेश्वरी देवस्थान कमिटी, अंबाजोगाई या न्यासाची मौजे चतुरवाडी ता. अंबाजोगाई जि.बीड येथील जमीन लावणी बाबत जाहीर लिलाव दि.१८/०६/२०२५ रोजी वार बुधवार सकाळी ठीक ११:०० वाजता श्री योगेश्वरी देवस्थान कार्यालय अंबाजोगाई येथे होणार आहे.

**मौजे चतुरवाडी ता. अंबाजोगाई सर्व्हे नंबर ५०९ जमीन क्षेत्र १७ एकर ३६ गुंठे**

**जमीन लावणी लिलाव शर्ती व अटी :–**

१) जमीन लावणी जाहीर लिलाव खुल्या प्रकारे तीन वर्षासाठी करण्यात येणार आहे. जमीन लावणी साल १ एप्रिल ते ३१ मार्च असेल.

२) जमीन लावणी करिता बोली बोलण्यासाठी अनामत रक्कम रु.५००००/– (पन्नास हजार रु) योगेश्वरी देवल कमिटी या नावाचा DD/RTGS द्वारे कार्यालामध्ये दि.१७/०६/२०२५ पर्यंत ऑफिस वेळेत स्वीकारली जाईल. (रोख रक्कम स्वीकारली जाणार नाही)

३) ज्यांनी जमीन लावणी रक्कम बोलीसाठी भरलेली असेल त्यांनाच हर्राशी बोलण्याचा अधिकार राहील व सोबत पासपोर्ट साईजचे २ फोटो व आधार कार्ड रक्कम भरणा करते वेळी द्यावेत ओळखपत्रा शिवाय जमीन लावणी लिलाव प्रक्रियेमध्ये सहभाग घेता येणार आहे.

४) जमीन लिलाव लावणी रक्कम बोली ज्याची जास्त असेल त्यांच्या नावे जमीन लावणी केली जाईल त्यांनी भरलेली बोली अनामत रक्कम परत मिळणार नाही व अनामत रक्कम बिनव्याजी असेल.

५) ज्यांना जमीन लावणी लिलाव मिळाला आहे त्यांनी आठ दिवसाच्या आत रु. ५००/– कोर्ट स्टंपवर शपथपत्र / करारनामा दाखल करावा लागेल शपथपत्र / करारनामा नमुना जमीन लावणीचे वेळी जमीन कस्तकऱ्यास दिला जाईल. सदरील शपथपत्र/करारनामा कार्यकारी दंडाधिकारी अंबाजोगाई यांच्या समक्ष केलेला ग्राह्य धरला जाईल.

६) जमीन लावली घेतलेल्या कस्तकर्यानी संपूर्ण लावणी रक्कम आठ दिवसाच्या आत योगेश्वरी देवस्थान कामिटी कार्यालयामध्ये भरणा करून रीतसर पावती घ्यावी सदरील दिलेल्या तारखे पर्यंत जमीन लावणी रक्कम भरणा न केल्यास सदरील कस्तकर्याची अनामत बोली रक्कम कार्यालयामध्ये देणगी म्हणून वापरली जाईल व त्या जमिनीची पुन्हा जाहीर लावणी केली जाईल त्यावेळी कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही.

७) पूर्वीच्या जमीन लावणी धारकांची जमीन लावणी रक्कम थकीत आहे किंवा चेक बाउन्स झाले आहेत अशी जमीन लावणी धारकांना जमीन लावणी बोलीमध्ये सहभाग घेता येणार नाही.

८) सदरील लावणी देणे अथवा नाकारणे याचा अधिकार योगेश्वरी देवस्थान कमिटी अंबाजोगाई यांनी राखून ठेवला आहे.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **अध्यक्ष** | **सचिव** |
| **श्री.योगेश्वरी देवस्थान,** | **श्री.योगेश्वरी देवस्थान,** |
| **अंबाजोगाई जि.बीड** | **अंबाजोगाई जि.बीड** |